MHGA130000352023

वि. सत्र खटला क्र.०३/२०२३
(जुना क्र. १०१/२००९)
महा.शासन मार्फत पोलीस स्टेशन,
असरअल्ली–वि–तिरुपती वेंकटी जनगम

## निशानी ३२ वरील आदेश
(दि.०४/१२/२०२४)

१. अर्जदार/आरोपी क्र.१–तिरुपती वेंकटी जनगम, रा. नडीकुडा, ता. सिरोंचा याने असरअल्ली पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक २१/२००८ मध्ये भा.दं. वि. कलम ३०७ ,५०६,३४ अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे. अर्जदार राह. नडीकुडा ,ता. सिरोंचा,जि. गडचिरोली येथील रहिवासी आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, त्याला दि. १८.०७.२०२३ रोजी अटक करण्यात आले. अर्जदार हा मौजा नदीकुडा येथील कायमचा रहिवासी आहे. तो १६ महिन्यापासुन चंद्रपूर कारागृहात आहे. तो शेतीचे काम करीत असून त्याचे घरातील तो एकमेव कमविता पुरुष आहे. त्याला जामीन दिल्यास तो प्रत्येक पेशी तारखेवर उपस्थित राहण्याची हमी देतो. करीता अर्जदारा/ आरोपी क्र १ ला जामीन देण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

३. सरकारी वकिल श्री भांडेकर यांनी अर्जास त्यांचे म्हणने नि.क्र.३२ च्या पाठीमागे आपले म्हणने सादर केली की, त्यांनी सदर अर्जाला विरोध दर्शविला आहे. अर्जदार हा दि २७.११.२००८ पासून फरार होता. तो दि १८.७.२०२३ पासून कारागृहात आहे. त्याचे विरुध्द लावण्यात आलेले आरोप हे गंभीर स्वरुपाचे आहेत. प्रकरणातील फिर्यादी/जखमी हा मरण पावला आहे, याचा अर्जदार गैरफायदा घेउ शकत नाही. १५ वर्षापासून तो का फरार असल्याचे त्याने स्पष्टीकरण दिले नाही आहे. करीता त्याचा जामीन अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली.

४. गुन्हयाची हकीकत अशी की, फिर्यादीने आपल्या तोंडी रिपोर्ट मध्ये अस कथन केले की, मागील दोन वर्षापासुन त्याचे गावातील चुलत भाउ नामे बापू वेंकटी जनगम याचे सोबत जमीनीचा वाद सूरु आहे. दि. २७.११.२००८ चे सकाळी ०८.०० वा. चे सुमारास तो आपले शेतात धान कापीत असता नामे बापु जनगम व त्याचा भाउ तिरुपती जनगम हे अचानक तिथे आले व त्यास ओडतान करीत ' तु आमचे शेतातील धान कशाला कापत आहे ? असे बालुन त्याची कॉलर पकडून त्यास गावातील चौकात आणले व त्याचे सोबत जमीनबाबत बाचाबाची करीत असता नामे रामया मलया माडेम हा मध्यस्थी होउन सोउविण्यास आला व बापूला विढा हातात घेउन भांडण करु नका असे म्हणाले असता ' तु कोण आहे आम्हाला सांगणारा, असे बोलून त्याला झिटकारले तेव्हा तो दुर गेला. त्यानंतर बापु जनगम व तिरुपती जनगम हे दोघेही त्याच्या अंगावर धाउन येउन मारपीठ केले व बापुने त्याच्या हातातील विढा हिसकावण्याचा प्रयत्न करीत असता त्याचे हाताला जखम झाल्याने तिरुपती जनगम याने त्याचे मुलीच्या हातातील विढा हिसकावून घ ेउन त्याचे डोक्यावर विढ्याने मारले, त्यामुळे डोक्यावर जखम होउन रक्तस्त्राव ाला व बापूने सुध्दा विढाने मारल्यामुळे डाव्या हाताला जखम झाली होती. त्याच्या डोक्याला व हाताला जखम झाल्याने हे दोघे त्याला मारतील या भितीने ते नामे माडेम मोंउी याचे घरात जाउन रक्तबंबाळ अवस्थेत लपला व आतुन दार बंद करुन घेतले.

५. बापु जनगम व तिरुपती जनगम यांनी त्यास जमीनीच्या वादावरुन विढ्याने मारल्याने त्याचे डोक्याला व हाताला जखम झाली अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरुन पो स्टे असरअल्ली येथे आरोपीं विरुध्द अप क २१/२००८ कलम ३०७,५०६,३४ भादंवि अंतर्गत गुन्ह्याची नोंद करुन तपासात घेतले.

६. अर्जदार/आरोपीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की,यातील फिर्यादी मरण पावलेला असून अभियोग पक्षाने जे दोन साक्षदार तपासलेले आहे ते दोन्ही साक्षदार फितूर झालेले आहे. अशा परिस्थीतीत अर्जदार याला गजाआड ठेवण्याचे कोणतेही कारण नाही त्यामुळे जामीन मंजूर करण्यात यावे अशी विनंती करण्यात आली आहे.

७. याउलट सरकारी वकिल श्री. भांडेकर यांनी असा युक्तीवाद मांडला की, गून्हा हा गंभीर स्वरुपाचा असून आरोपी हा मागील १५ वर्षापासून फरार होता जर त्याला

जामीन दिले तर तो पून्हा फरार होउ शकतो त्यामुळे आरोपीला जामीन मंजूर करण्यात येउ नये अशी विनंती करण्यात आली.

८. एकुणच आरोपी हा १५ वर्षापासून फरार असल्यानंतर आरोपीला अटक केल्यावर दोषारोप दि १९.१.२०२४ रोजी नोंदविण्यात आले त्यानंतर अभियोग पक्षाने दि ११.७.२०२४ रोजी दोन साक्षदार तपासले. फिर्यादी हा मृत्यूपावला आहे असे पोलिसांनी अहवाल व मृत्यूचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. अशा परिस्थीतीत अर्जदार याला गजाआड ठेवणे न्यायोचित होणार नाही. आरोपी हा १५ वर्षापासून फरार असल्यामुळे त्याच्यावर दंडात्मक कारवाई करता येईल. करीता खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज निशानी ३२ आरोपीला दोन हजार रुपये दंडाची रक्कम भरल्यावर मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार आरोपी क्र.१–तिरुपती वेंकटी जनगम, रा. नडीकुडा, ता. सिरोंचा यास असरअल्ली पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक २१/२००८, भा.दं.वि. कलम ३०७ ,५०६,३४ अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये जामीन मंजुर करण्यात येते.

३. अर्जदाराने रक्कम रु.३०,०००/– जात मुचलक्याची (P.R. Bond) व तेवढयाच रकमेचा एक जामीन (Surety) देण्यात यावा.

४. अर्जदाराने गुन्हयाची पुनरावृत्ती करु नये तसेच दर तारखेला न्यायालयात पेशी तारखेला हजर राहावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAVISHANKAR NAMDEORAO BAWANKAR
Date: 2024.12.04 17:49:31 +0530

अहेरी
दि.०४.१२.२०२४

(र.ना. बावनकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.